# सार्वजनिक सूचना

*महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्र, ऐरोली यांचे आर्थिक वर्ष २०१९-२० ते २०२१-२२ पत्रकाचे अंतिम समायोजन, आर्थिक वर्ष २०२२-२३ करिता तात्पुरते समायोजन आणि २०२३-२४ ते २०२४-२५ या नियंत्रण कालावधीसाठी वार्षिक सुधारित अंदाजासाठी महसूलाची मागणी, शुल्क व दरपत्रक निश्चितीसाठी याचिकेवर हरकती व सुचना मागविण्याबाबत.*

***(प्रकरण क्र.२३३-२०२२)***

१. महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्र (म.रा.भा.प्रे.कें.) ने आर्थिक २०१९-२० ते २०२१-२२ पत्रकाचे अंतिम समायोजन, आर्थिक वर्ष २०२२-२३ करिता तात्पुरते समायोजन आणि २०२३-२४ ते २०२४-२५ या नियंत्रण कालावधीसाठी वार्षिक सुधारित अंदाजासाठी महसूलाची मागणी, शुल्क व दरपत्रक निश्चितीसाठी याचिका दाखल केलेली आहे.

२. महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोगाने याचिका दिनांक २२ डिसेंबर २०२२ रोजी दाखल करून महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्र, कळवा यांना विद्युत कायदा २००३ चे कलम ६४ (२) नुसार जाहीर सूचना प्रसिध्द करून हकरती व सूचना मागविणेबाबत आदेश जारी केले आहेत.

३. सदर याचिकेची ठळक वैशिष्टये खालीलप्रमाणे आहेत. त्यामध्ये नमूद केलेल्या मंजूर रक्कमा एम.ई.आर.सी. आदेश प्रकरण क्र.२९१/२०१९ नुसार आहेत.

**तक्ता १.आर्थिक वर्ष २०१९-२० ते २०२१-२२च्या अंतिम समायोजन सारांश (रूपये लाखात)**

| अ. क्र. | तपशिल | आर्थिक वर्ष २०१९-२० | | आर्थिक वर्ष २०२०-२१ | | आर्थिक वर्ष २०२१-२२ | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | एम.वाय.टी. मंजूर | निव्वळ हक्क (प्रस्तावित) | एम.वाय.टी. मंजूर | निव्वळ हक्क (प्रस्तावित) | एम.वाय.टी. मंजूर | निव्वळ हक्क (प्रस्तावित) |
| १ | एकूण खर्च | ३८६५.१४ | ३७५५.०१ | ४७५८.९९ | ३९६६.०३ | ४५१२.९४ | ४२६८.७९ |
| २ | वजा: इतर उत्पन्न | २५६.७१ | ४११.५८ | २१०.७१ | ४५६.०४ | १२४.५६ | ३५७.७५ |
| ३ | वजा-ओपन एक्सेस चार्जसेसचे उत्पन्न | ११३४.०० | १३६५.८७ | ११५६.६८ | ८५४.३३ | ११७९.८१ | १५७२.४७ |
| ४ | वजा:रिॲक्टीव ऊर्जा प्रभार उत्पन्न | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० |
| ५ | वार्षिक निश्चित शुल्क | २४७४.४४ | १९७७.५६ | ३३९१.६० | २६५५.६६ | ३२०८.५७ | २३३८.५६ |
| ६ | महसूल मंजूर/ वास्तविक | २९०१.९७ | २९०२.०८ | ३३९१.६० | ३३८८.७७ | ३२०८.५७ | ३२११.२४ |
| ७ | महसूलातील अंतर/अधिशेष | -४२७.५३ | -९२४.५२ | ०.०० | -७३३.११ | ०.०० | -८७२.६८ |

* सूचनेमध्ये अतिरिक्त रक्कम वजा चिन्हाने दर्शविलेली आहे.

**तक्ता २.आर्थिक वर्ष २०२२-२३ साठी तात्पुररता समायोजन सारांश आणि आर्थिक वर्ष २०२३-२४ ते आर्थिक वर्ष २०२४-२५ साठी सुधारित AFC(रूपये लाखात)**

| अ. क्र. | तपशिल | आर्थिक वर्ष २०२२-२३ (तात्पुरते ट्रू-अप) | |
|---|---|---|---|
| | | मंजूर | लेखांकित |
| १ | एकूण खर्च | ४७३९.८० | ४६५०.९२ |
| २ | वजा : इतर उत्पन्न | ५६.८४ | ३३८.८६ |
| ३ | वजा :ओपन एक्सेस चार्जसेसचे उत्पन्न | १२०३.४१ | १२०३.४१ |
| ४ | वजा: रिॲक्टीव ऊर्जा प्रभारउत्पन्न | | |
| ५ | म.रा.भा.प्रें.कें.एकूण वार्षिक कायम प्रभार (ए.एफ.सी) | ३४७९.५६ | ३१०८.६४ |
| ६ | महसूल | ३४७९.५६ | ३४७९.५६ |
| ७ | अंतर/अधिशेष | ०.०० | -३७०.९२ |

| अ. क्र. | तपशिल | आर्थिक वर्ष २०२३-२४(सुधारित ARR) | | आर्थिक वर्ष २०२४-२५(सुधारित ARR) | |
|---|---|---|---|---|---|
| | | मंजूर | सुधारित (प्रस्तावित) | मंजूर | सुधारित (प्रस्तावित) |
| १ | एकूण खर्च | ५००५.१५ | ४९८८.८५ | ५१३२.०२ | ५३३५.१४ |
| २ | वजा : नॉन टेरिफ उत्पन्न | २०.४७ | १९३.४९ | १४.९० | ४८.२२ |
| ३ | वजा : ओपन एक्सेस चार्जसेसचे उत्पन्न | १२२७.४८ | १२२७.४८ | १२५२.०३ | १२५२.०३ |
| ४ | वजा: रिॲक्टीव ऊर्जा प्रभारउत्पन्न | | | | |
| ५ | म.रा.भा.प्रे.कें.एकूण वार्षिक निश्चित कायम शुल्क (ए.एफ. सी) | ३७५७.२१ | ३५६७.८८ | ३८६५.१० | ४०३४.८९ |
| ६ | महसूल | ३७५७.२१ | ३५६७.८८ | ३८६५.१० | ४०३४.८९ |
| ७ | अंतर/अधिशेष | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० |

* सूचनेमध्ये अतिरिक्त रक्कम वजा चिन्हाने दर्शविलेली आहे.

**तक्ता:३. आर्थिक वर्ष २०२३-२४ ते आर्थिक वर्ष २०२४-२५ साठी प्रस्तावित म.रा.भा.प्रे.कें. शुल्कांची वाटणी (रूपये लाखात)**

| पारेषण प्रणाली वापरकर्ता | भाग (% मध्ये) | आर्थिक वर्ष २०२३-२४ | आर्थिक वर्ष २०२४-२५ |
|---|---|---|---|
| म रा वि वि कं मर्या. | ८६.४१५% | ३०८३.१७ | ३४८६.७३ |
| टाटा वितरण | ३.१७२% | ११३.१९ | १२८.०० |
| अदानी इलेक्ट्रीसीटी मुंबई लि - वितरण | ५.७५१% | २०५.१८ | २३२.०४ |
| बेस्ट | २.९८३% | १०६.४२ | १२०.३५ |
| मध्य रेल्वे (भारतीय रेल्वे) | १.५२८% | ५४.५० | ६१.६४ |
| मांईंडस्पेस बिझनेस पार्कस प्रा.लि. | ०.०२९% | १.०४ | १.१७ |
| गिगाप्लेक्स इस्टेट प्रा.लि. | ०.०१५% | ०.५५ | ०.६२ |
| निदार युटीलिटीज पनवेल एलएलपी | ०.०१०% | ०.३५ | ०.४० |
| केआरसी इनफ्रास्टकर्च प्रोजेक्ट आणि प्रा.लि. | ०.०११% | ०.४० | ०.४५ |
| महाराष्ट्र विमानतळ विकास महामंडळ | ०.०४७% | १.६९ | १.९१ |
| इ ऑन फेज -१ | ०.०२५% | ०.८९ | १.०० |
| इ ऑन फेज -२ | ०.०१०% | ०.३७ | ०.४२ |
| जेएनपीटी | ०.००२% | ०.०६ | ०.०७ |
| लक्ष्मीपती बालाजी | ०.००२% | ०.०९ | ०.१० |
| **एकूण म.रा.भा.प्रे.कें. शुल्क** | १००.००% | ३५६७.८८ | ४०३४.८९ |

**तक्ता ४: महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्राच्या प्रस्तावित प्रभार आर्थिक वर्ष २०२३-२४ ते आर्थिक वर्ष २०२४-२५ (रूपये / मे.वॅट /माहे)**

| अ.क्र. | मासिक म.रा.भा.प्रे.कें. शुल्क | आर्थिक वर्ष २०२३-२४ | आर्थिक वर्ष २०२४-२५ |
|---|---|---|---|
| १ | एकूण भार प्रेषण केंद्र प्रभार (रूपये लाखात) | ३५६७.८८ | ४०३४.८९ |
| २ | आधारभूत पारेषण अधिकार क्षमता (एमडब्ल्यू) | २४८५६ | २५६०८ |
| ३ | सुधारित /प्रस्तावित भार प्रेषण प्रभार (रूपये /मे.वॅट / माहे) | ११९६.१८ | १३१३.०४ |

**तक्ता ५ : विद्यमान आणि प्रस्तावित महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्र शुल्क व प्रभार आर्थिक वर्ष २०२३-२४ ते आर्थिक वर्ष २०२४-२५ साठी (रुपये लाखात)**

| अ. क्र. | तपशिल | प्रस्तावित शुल्क |
|---|---|---|
| १ | नोंदणी / (जोडणी शुल्क) | रू. २०,००० प्रति कनेक्शन |
| २ | शेडयुलिंग प्रभार | रू. २२५० प्रति दिवस |
| ३ | रि-शेडयुलिंग प्रभार | रू. २२५० प्रति पुनरावृत्ती |
| ४ | अल्पकालीन मुक्त प्रवेश शुल्क | रू.७५०० प्रति अर्ज |
| ५ | आर.ई.सी.प्रक्रिया शुल्क | रू.१००० प्रति अर्ज |

३. तपशीलवार याचिका दस्तेऐवज आणि कार्यकारी सारांश म.रा.भा.प्रे.कें.च्या वेबसाईटवर (www.mahasldc.in) उपलब्ध आहे आणि आयोगाच्या www.merc.gov.in वेबसाईटवर डाउनलोड करण्यायोग्य स्वरुपात उपलब्ध आहे .(विनामुल्य)

४. खालील दस्तवेजाच्या लिखित स्वरुपात विनंती केल्यास भार प्रेषण केंद्राच्या कार्यालयातून मिळू शकतील.

अ. प्रस्तावांचा कार्यकारी सारांश (नि:शुल्क मराठी /इंग्रजी मध्ये)
ब. दाव्याचे तपशिलवार इंग्रजीतील दस्तऐवज व सीडी (कॅश/डीडीद्वारा रु. १०० चा भरणा केल्यानंतर) डीडी महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्र, ऐराली यांचे नावाने काढावा
क. दाव्याचे तपशिलवार दस्तऐवज (इंग्रजी मध्ये) ( रु. ५० चा भरणा केल्यानंतर)
ड. दाव्याचे तपशिलवार दस्तऐवज सीडी स्वरुपात ( रु. ५० चा भरणा केल्यानंतर)

| कार्यालय | पत्ता | दूरध्वनी / फॅक्स क्र. | ईमेल |
|---|---|---|---|
| महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्र, ऐरोली | ठाणे-बेलापूर रोड, मु.पो.. ऐरोली, नवी मुंबई- ४०० ७०८ महाराष्ट्र, भारत | दूरध्वनी : +९१-२२-२७६०१७६५/१७६६<br>फॅक्स +९१-२२-२७६०१७६९/२९३६ | cesldc@mahasldc.in |

५. नियामक आयोगाने महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्रास वरील दाव्यावर सूचना / अभिप्राय या जाहीर सूचनेद्वारे मागविण्याकरिता आदेश दिले आहेत., प्रकाशित केलेल्या सार्वजनिक सूचनेला प्रतिसाद म्हणून,सूचना/आक्षेप नोंदवण्याची इच्छा असलेली प्रत्येक व्यक्ती ती एम.इ.आर. सी वेबसाईट वर (www.merc.gov.in/e-public-consultation). 'ई-पब्लिक कन्सल्टेशन ' टॅबद्वारे अपलोड करून इंग्रजी किंवा मराठी भाषेत लिखित स्वरुपात सूचना / आक्षेप सादर करू शकते. 'ई-पब्लिक कन्सल्टेशन ' सल्लामसलत. या वैशिष्ट्यात प्रवेश करण्यात कोणतीही अडचण आल्यास, संबंधित व्यक्ती एम.इ.आर. सी कार्यालयाशी मोबाईल क्रमांक: ८९२८०७१५२२ किंवा ईमेल आयडी : suggestions@merc.gov.in वर सर्व कामकाजाच्या दिवसामध्ये सकाळी १०.०० ते संध्याकाळी ६.०० दरम्यान संपर्क साधू शकतात.

६. ज्या व्यक्तीने 'ई-पब्लिक कन्सल्टेशन ' टॅबवर सूचना आणि हरकती अपलोड केल्या आहेत, त्यांना त्याच्या सूचना / आक्षेप याची कोणतीही सत्यप्रत फाइल करण्याची गरज नाही. ज्या व्यक्तीना इलेक्ट्रॉनिक मीडीयामध्ये प्रवेश करता येत नाही ते त्याच्या सूचना आणि हरकती ''सचिव , महाराष्ट्र विद्युत नियमक आयोग (एम.इ.आर.सी) ,१३ वा मजला , केंद्र क्रमांक १, वर्ल्ड ट्रेड सेंटर ,कफ परेड, मुंबई ४०० ००५ येथे पाठवावी तसेच पाठवलेल्या सूचना / आक्षेपाची प्रत महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्र, मुख्य अभियंता कार्यालय , महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्र, ठाणे -बेलापूर रोड, मु.पो. ऐरोली, नवी मुंबई - ४०० ७०८, महाराष्ट्र ,भारत , फॅक्स : +९१-२२-२७६०१७६९/२९३६, ईमेल : cesldc@mahasldc.in / cesldc@mahatransco.in येथे पाठवावी. तसेच १७ जानेवारी २०२३ रोजी संध्याकाळी ५.०० वाजल्यानंतर प्राप्त झालेल्या सूचना किंवा हरकतीचा विचार केला जाणार नाही. इतर कोणत्याही पदधतीने दाखल केलेल्या सूचना/ आक्षेपाचा विचार केला जाणार नाही.

७. महराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्राला १७ जानेवारी २०२३ पर्यंत प्राप्त झालेल्या सर्व सूचना / आक्षेपांसाठी प्राप्त झाल्यापासून ३ दिवसात प्रत्येक सूचना /आक्षेपांना उत्तर देता येईल. पण जास्तीत जास्त २० जानेवारी २०२३ पर्यंत.म.रा.भा.प्रे.कें .द्वारे ई-सार्वजनिक सुनावणी दरम्यान किंवा नवीनतम २७ जानेवारी २०२३ पर्यंत दिलेल्या उत्तरांवर भागधारक त्यांचे उत्तर सादर करू शकतात.

८. वरील परिच्छेद ५ नुसार प्रेषक / आक्षेप घेणाऱ्याने त्यांच्या सूचना/ आक्षेप सादर केले असतील, तर त्यांना ई-सार्वजनिक सुनावणी दरम्यान ऐकायचे असेल, तर त्यांनी सूचना/ आक्षेप दाखल करताना त्यांचा विशेष उल्लेख करावा.अशा प्रकरणांमध्ये, वैध ईमेल आयडी आणि भ्रमणध्वनी क्रमांक सादर करणे अनिवार्य असेल. मंगळवार २४ जानेवारी २०२३ रोजी सकाळी १०.३० वाजाता व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे आयोजित करण्यात येणाऱ्या ई- सार्वजनिक सुनावणीमध्ये आयोग अशा प्रेषक /आक्षेपार्हांना आपल्या स्वेच्छा निर्णया नुसार ऐकण्याची परवानगी देऊ शकतो, ज्यासाठी कोणतीही वेगळी सूचना दिली जाणार नाही.

९. ई- पब्लिक सुनावणीला उपस्थित राहणारे सर्व सहभागी, आयोगाने १४ नोव्हेंबर २०२२ रोजी जारी केलेल्या आयोगासमोरील याचिकांच्या ई-फाईलिंग आणि ई सुनावणीसाठी फॉलो केल्या जाणाऱ्या 'ऑपरेशनल प्रोसिजर आणि प्रोटोकॉल ' वरील सराव निर्देशाचे पालन करतील.

ठिकाण : ऐरोली, नवी मुंबई

तारीख : २६ डिसेंबर,२०२२

**मुख्य अभियंता**

**महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्र**